# महाराष्ट्र को-ऑप क्रेडिट न्यूज

MAHARASHTRA CO. OP. CREDIT NEWS

| वर्ष १४ वे | अंक १० वा | ऑगस्ट २०१८ | किंमत : ₹ २० | एकूण पृष्ठे ३६ |

**सहकार चळवळीला वाहिलेले, पतसंस्थांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्नरत असलेले मार्गदर्शनपर मासिक**



पतसंस्थांना आयकर कायदा २६९, ८०, जीएसटी, पी एफ, या विषयावर अर्थमंत्री मा. श्री. पियुषजी गोयल, केंद्रीय मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी, गिरनार पतसंस्थेचे अध्यक्ष आमदार. मा. श्री कृष्णा खोपडे यांच्या माध्यामातून निवेदन सादर करताना राज्य फेडरेशनचे अध्यक्ष श्री. काका कोयटे, कार्याध्यक्ष. श्री. राजूदास जाधव बुलढाणा अर्बनचे सीईओ डॉ. सुकेश झंवर, नागपूर जिल्हा संघाचे श्री. राजेंद्र घाटे, श्री. रविंद्र सातपुते, श्री. एस यू शर्मा, श्री. आशिष मुखीम (सीए) व उपस्थित मान्यवर.



राज्य फेडरेशनच्या दीपस्तंभ पुरस्काराचे वितरण कार्यक्रमाचे निमंत्रण विधानपरिषदेचे सभापती ना. श्री. रामराजे निंबाळकर यांना देताना राज्यफेडरशनचे अध्यक्ष श्री. काका कोयटे व खजिनदार श्री. दादाराव तुपकर



'' चेअरमन ऑफ द मंथ सिरिज



## राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीर

### महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन पुरस्कृत राज्यस्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्कार २०१८

मंगळवार दि. २५ सप्टेंबर व बुधवार २६ सप्टेंबर २०१८

स्थळ - हॉटेल ड्रिम लॅन्ड, महाबळेश्वर

# महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन पुरस्कृत राज्यस्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्कार २०१८

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन हि फक्त पतसंस्थांसाठी कार्यरत असणारी राज्यस्तरीय शिखर संस्था आहे. पतसंस्थांचे विविध प्रश्न समस्या अडचणी शासन दरबारी मांडणे, त्यांचा पाठपुरावा करणे. पतसंस्थांच्या विकासासाठी व त्यांच्या कामकाजाची गुणवत्ता वाढावी यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. मेळावे, आंदोलने, मोर्चा, सहकार यात्रा, सहकार आरती अशा विविध मार्गाचा प्रसंगानुरूप अवलंब करून पतसंस्थांना बळकटी देण्याचे काम केले जाते.

सहकारी पतसंस्था आपल्या स्वबळावर आपले कामकाज चालवितात त्यांना शासनाचे कोणत्याही प्रकारचे सहकार्य लाभत नाही. याचबरोबर बदलते आधुनिक तंत्रज्ञान, वाढती स्पर्धा, सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि सहकार क्षेत्रातील घडामोडीचा पतसंस्थांच्या कार्यभारावरही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. या सर्वांचा समतोल साधून पतसंस्था आपले कामकाज करतात. सभासदांची विश्वासर्हता वाढवितात, नफा मिळवितात, आपल्या ग्राहकांचा विकास साधतात आणि प्रगतीचे शिखर गाठतात. अशा राज्यातील पतसंस्था इतर पतसंस्थांसाठी **Roll Model** ठराव्यात यासाठी राज्य फेडरेशनच्या वतीने सर्व विभागातून राज्यस्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्कार २०१८ घोषित करण्यात आलेला आहे.

## विभागीय पुरस्कार




**१) कोकण –** मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

**२) नाशिक –** नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर

**३) पुणे –** पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर

**४) औरंगाबाद –** औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर

**५) अमरावती –** अमरावती, बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ

**६) नागपूर –** नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली

**वरील प्रत्येक विभागात खालील प्रमाणे गट तयार करण्यात आलेले आहेत.**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | गट क्र. १ =<br>१ ते १० कोटी ठेवी असणाऱ्या संस्था | गट क्र. ३ =<br>५० ते १०० कोटी ठेवी असणाऱ्या संस्था – | प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक |
| प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | गट क्र. २ =<br>१० ते ५० कोटी ठेवी असणाऱ्या संस्था | गट क्र. ४ =<br>१०० ते त्यापुढील कोटी ठेवी असणाऱ्या संस्था | प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक |

**वरील प्रत्येक गटात तीन पुरस्कार प्रदान करण्यात येतील.**

राज्य पातळीवर दिशादर्शक कामकाज असणाऱ्या पतसंस्थांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. पतसंस्थांनी पुरस्कारासाठी प्रस्ताव खालील मुद्यांच्या आधारे माहिती तयार करून आवश्यक तेथे विस्तृत माहिती व आकडेवारी सादर करावी.

♦ **आर्थिक निकष :–** (खालील आर्थिक आकडेवारी संस्थेच्या लेखापरिक्षकाकडून प्रमाणित करून पाठवावी.

१) गत तीन वर्षाची वाढ (व्यवसाय वृद्धीचा तक्ता जोडावा)

२) मागील तीन वर्षाची थकबाकी

३) पतसंस्थेने केलेली गुंतवणूक (यादी जोडावी)

४) सन २०१६ –१७ व २०१७–१८ चे आर्थिक पत्रके

♦ **आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**

पतसंस्था सर्वांगीण विकासासाठी आर्थिक सक्षमतेबरोबरच पतसंस्थांच्या सभासदांसाठी विविध प्रकारचे तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. आपल्या पतसंस्थेत कोणकोणत्या प्रकारचे तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो याची सविस्तर माहिती द्यावी. .

♦ डेली कलेक्शन (योजना असल्यास) मोबाईल ॲपद्वारे होते काय

♦ एसएमएस बँकिंग सुविधा आहे काय ?

♦ कोअर बँकिंग प्रणाली आहे काय ? ?

♦ संस्थेने (Information Security Policy) तयार केली आहे काय ?

♦ इनवर्ड / आऊटवर्ड RTGS / NEFT ची सुविधा विद्यमान संगणक प्रणालीमध्ये आहे काय ? ✻ संस्थेचे एटीएम आहे काय ?

♦ **संस्थेची वसुलीसाठी यंत्रणा –**

आपल्या पतसंस्थेत कर्जवसुलीसाठी कर्जवसुली व्यवस्थापन कशा प्रकारे होते. आपल्या वसुली प्रक्रियेबाबत माहिती विशद करावी.

♦ **संस्थेचे सहकार चळवळीसाठीचे योगदान**

सहकार क्षेत्रात पतसंस्थांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. सहकार हा प्रत्येक व्यक्ति विकासासाठी अनिवार्य आणि पतसंस्था हेच कार्य करतात. सहकार चळवळ सक्षम होणेसाठी तिचा प्रचार प्रसार करणेसाठी आपल्या संस्था सहकार चळवळीसाठी केलेल्या योगदानाबाबत सविस्तर माहिती द्या.

♦ **संस्थेच्या ग्राहकांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांची सविस्तर माहिती दयावी.**

**प्रस्ताव –** पतसंस्थांनी पुरस्कारासाठी आपले प्रस्ताव निकषाप्रमाणे दोन प्रतीत तयार करून ३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत राज्य पतसंस्था फेडरेशन, पुणे येथील कार्यालयात पाठवावेत.(प्रस्ताव शुल्क १,०००/– + GST 18%)

# महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., व

## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या., कराड

आयोजित

# राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीर

मंगळवार दि. २५ सप्टेंबर व बुधवार २६ सप्टेंबर २०१८

स्थळ – हॉटेल ड्रिम लॅन्ड, महाबळेश्वर

## नियोजित वेळापत्रक

### २५ सप्टेंबर २०१८

| | | |
|---|---|---|
| सकाळी– | १०.३० ते ११.३० | नाव नोंदणी |
| सकाळी– | ११.३० ते १२.०० | उद्घाटन समारंभ |
| दुपारी– | १२.०० ते १.३० | व्याख्यान –१ |
| दुपारी– | १.३० ते २.३० | भोजन |
| दुपारी– | २.३० ते ४.०० | व्याख्यान – २ |
| सायं– | ४.०० ते ५.३० | व्याख्यान – ३ |
| सायं– | ५.३० ते ७.०० | परिचय व विश्रांती |

### २६ सप्टेंबर २०१८

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ०९.३० ते १०.०० | नाष्टा |
| सकाळी | १०.०० ते ११.३० | व्याख्यान– ४ |
| सकाळी | ११.३० ते ०१.०० | व्याख्यान – ५ |
| दुपारी | ०१.०० ते ०२.०० | भोजन |
| दुपारी | ०२.०० ते ०३.३० | पुरस्कार समारंभ |
| दुपारी | ३.३० | राज्य फेडरेशनची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा |

सूचना : पान क्र. ३२ वर नजरचूकीने २९ व ३० सप्टेंबर असा प्रशिक्षणाचा दिनांक झालेला असून तो २५ व २६ सप्टेंबर २०१८ असा वाचावा.



प्रति व्यक्ती रक्कम रू. ३,२००/– + GST 18% = (A/c Room)

- ♦ अनिवासी (प्रति व्यक्ती) रक्कम रू. २,२००/– + GST 18%
- ♦ वाहन चालक शुल्क – प्रति वाहन चालक रू. १,८००/- GST 18% (चालकाची निवास व भोजन व्यवस्था)
- ♦ सर्व रूम ३ किंवा ४ बेडचे आहेत. निवास व्यवस्था शेअरींगमध्ये आहे.
- ♦ २ बेडची स्वतंत्र व्यवस्था हवी असल्यास मुळ शुल्कात १,२००/– + GST 18% अतिरिक्त शुल्क भरावे लागेल.
- ♦ प्रशिक्षण शुल्कामध्ये – प्रशिक्षण, पृष्ठाधार साहित्य, निवास, नाष्टा, भोजन, हाय टी, प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र
- ♦ दि. २४ सप्टेंबर व २७ सप्टेंबर निवास व्यवस्था हवी असल्यास परस्पर हॉटेलशी संपर्क साधावा.

* नोंदणी १० सप्टेंबर २०१८ पर्यंत, जागा मर्यादीत असल्याने पूर्व नाव नोंदणी आवश्यक
* तथापि २०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी पूर्ण झाल्यास दि. १० सप्टेंबर पूर्वी सुध्दा नोंदणी बंद करण्यात येईल.
* नोंदणी फॉर्म पान ३२ वर आहे. फेडरेशनच्या कार्यालयात अथवा ईमेलवर पाठवावा

  Email - mafcocstrain90@gmail.com
* २५ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ११ वा. रूम (चेक इन)
* २६ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० वा. रूम (चेक आऊट)

**Bank Details- Account Name -** Maharashtra State Co.Op.Credit Societies Federation Ltd.

**Bank Name -** Kotak Mahindra Bank **Branch -** Prime Center, Shivaji Nagar, Model Colony, Pune – 411016

**Account Number -** 6512024794 **RTGS/NEFT/IFSC -** KKBK0001759

स्थळ – हॉटेल ड्रिम लॅन्ड, महाबळेश्वर (एस.टी स्टँडच्या मागे) फोन – ०२१६८–२६०२२८, २६००६०

# बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., बुलडाणा, र.नं. २६७ (मल्टीस्टेट)

(संस्थेचे कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ,गुजरात, अंदमान-निकोबार)

मुख्यकार्यालय :: सहकार सेतू, हुतात्मा गोरे पथ , बुलडाणा - ४४३ ००१ (महाराष्ट्र)

भारतातील पहिली ISO - 9001 : 2000 व SA 8000 - 2002 मानांकित

**॥ संस्थेची आर्थिक स्थिती ॥**

* एकुण ठेवी : ५४३३ कोटी
* एकूण कर्ज : ४५२९ कोटी
* एकुण सभासद : ७७२००० 
* एकूण शाखा : ४१८
* एकूण गोदाम : ३००
* सोने तारण कर्ज वाटप : १०५० कोटी
* कार्यक्षेत्र : महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गुजरात, अदमान निकोबार, गोवा, आंध्रप्रदेश

**॥ संस्थेचे प्रकल्प ॥**

* पुणे येथे सभासदांच्या पाल्यांसाठी वसतिगृह
* उच्च शिक्षण घेऊ इच्छिनाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कर्ज योजना
* तिरुपती (आंध्रप्रदेश) येथे भक्तनिकेतन
* माहुर (जि. नांदेड) येथे भक्तनिकेतन
* बुलडाणा येथे १२५ मुलींकरीता छात्रानिकेतन सुविधा
* ३०० वेअर हाऊस (ग्रेन बँक)
* बुलडाणा गोरक्षण धाम

**॥ नियोजित ॥**

* जिवनसंध्या स्वर्गाश्रम व वेदविद्यालय
* ओंकारेश्वर (म.प्र.) व शिर्डी येथे धर्मशाळा

फोन नं. (०७२६२)२४२७०५, २४३७०५

www.buldanaurban.in ला भेट द्या Email : buldanaurban@rediffmail.com

वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच वैद्यकीय व्यावसायिकांसाठी कर्ज पुरवठ्याची सुविधा

## बुलडाणा अर्बन चॅरिटेबल द्वारा संचालित, विदर्भातील पहील निवासी शाळा

## सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय,

विद्यानगरी, चिखली रोड, बुलडाणा

**वर्ग १ ली ते १२ (विज्ञान शाखा)**

AQSR

ISO 9001 - 2000 Registered

**वैशिष्टे**

* बुलडाणा शहरापासुन ५ कि.मी.अंतरावर प्रदुषण विरहीत वातावरणात ३० एकराच्या विशालकाय परिसरामधील अनोखी शाळा
* अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ञ विशाल पुस्तकालय,पाठशाळा,विशाल भोजन कक्ष,ईडोअर व आऊटडोअर स्टेडीयम व सुविधायुक्त सहकार विद्या मंदिर
* पौष्टीक भोजन तथा स्वास्थ रक्षा
* शैक्षणिक भ्रमण , आश्वारोहण, गिर्यारोहण, नेमबाजी,स्विमिंग, स्केटींग, कराटे, संगीत,तलवार बाजी आणि खुप काही...
* भारतीय संस्कृतीवर आधारित एक परिपूर्ण शिक्षण, जिथे आपला पाल्य शिक्षण व नैतीक मुल्यांनी आपल्या सर्वांगीण विकासामुळे एक आदर्श नागरीक बनु शकेल
* विद्यार्थी निवास :- विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र व्यवस्था

फोन नं. (०७२६२)२४२७०५, २४३७०५

www. sahakarvidyamandir.in

**॥ विनीत ॥**



**सौ. कोमल झंवर**

अध्यक्षा,बुलडाणा अर्बन, बुलडाणा



**राधेश्याम चांडक**

संस्थापक अध्यक्ष,बुलडाणा अर्बन, बुलडाणा



**डॉ.सुकेश झंवर**

चिफ मॅनेजिंग डायरेक्टर बुलडाणा अर्बन, बुलडाणा

**सहकाराची समृध्द परंपरा** **बुलडाणा अर्बन**

MAFCOCS
महाराष्ट्र को-ऑप.
# क्रेडिट न्यूज
वर्ष १४ वे, ऑगस्ट २०१८

**संपादकीय मंडळ**
❖ अध्यक्ष ❖
ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे
❖ संपादक ❖
विनोद कुलकर्णी
❖ कार्यकारी संपादक ❖
लक्ष्मणराव पाटील
❖ उपसंपादक ❖
सौ. अंजली गोपाळ पाटील
❖ सदस्य ❖
डॉ. शांतीलाल तेजमल सिंगी
ॲड. दीपक पटवर्धन
सौ. भारती राजेंद्र मुथ्था
सोमनाथ साळुबा गायकवाड
शरद रामचंद्र जाधव
❖ मुख्य कार्यकारी अधिकारी ❖
सौ. सुरेखा विजय लवांडे

ई-मेल : creditnews90@gmail.com
वेबसाईट : www.mafcocs.com
7888281251
**संपादकीय कार्यालय**
क्रेडीट न्यूज विभाग
सुरक्षा भवन, प्लॉट नं. ९, इंडस्ट्रियल इस्टेट,
गुलटेकडी, मुकुंदनगर, पुणे - ४११०३७,

## अंतरंग

अध्यक्षीय मनोगत ....................................७
संपादकीय ..............................................८
सहकारी संस्थांचे भवितव्य .............................९
प्रशिक्षण ...............................................१४
निर्णय प्रक्रिया कशी असावी? ..........................१५
चेअरमन ऑफ द मंथ.................................१९
श्री. पियुष गोयल व नितीन गडकरी
यांना सादर केलेले निवेदन..............................२१
परिपत्रक ...............................................२४
वीराचार्य पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी...................२८
पतसंस्था सर्व्हे फॉर्म....................................२९
नाव नोंदणी फॉर्म.......................................३२

**कृपया राज्य फेडरेशनचा खालील व्हॉटस् ॲप क्रमांक आपल्या माहिती व संपर्कासाठी**
7888281251

**प्रशासकीय कार्यालय**
**पत्रव्यवहार व संपर्क**
**सीटीसी क्र ११९/बी, प्रमिला अपार्टमेंट,**
**तिसरा मजला, 'लक्की' बंगलो शेजारी,**
**लक्की रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे ४११०१६**
**फोन : ०२०-२५६७३००८ / २५६७९००८**
E-mail : mafcocs90@gmail.com

**या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

'महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक सौ. सुरेखा विजय लवांडे यांनी श्री.जे. प्रिंटर्स प्रा.लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., सुरक्षा भवन, १ला मजला, प्लॉट नं. ९, इंडस्ट्रियल इस्टेट, मुकुंदनगर, पुणे येथे प्रसिद्ध केले.
संपादक - विनोद कुलकर्णी

# महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.

## संचालक मंडळ

❖ अध्यक्ष ❖

श्री. ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे

❖ कार्याध्यक्ष ❖

श्री. राजुदास लक्ष्मणराव जाधव

❖ उपकार्याध्यक्ष ❖

श्री. सुदर्शन अंबादास भालेराव

❖ महासचिव ❖

डॉ. श्री. शांतीलाल तेजमल सिंगी

❖ खजिनदार ❖

श्री. दादाराव भाऊराव तुपकर

❖ संचालक ❖

श्री. वसंत नाथा शिंदे
श्री. प्रकाश गोपाळराव पोहरे
श्री. विनोद सुर्यनारायण कुलकर्णी
सौ. अंजली गोपाळ पाटील
श्री. सुरेश गणपत पाटील
श्री. शशिकांत बापुसाहेब राजोबा
श्री. सोमनाथ साळुबा गायकवाड
श्री. संग्रामसिंग दिलीपराव पाटील
श्री. राधेश्याम देवकिसन चांडक
श्री. भास्कर कृष्णा कोठावदे
श्री. चंद्रकांत श्रीरंग वंजारी
सौ. भारती राजेंद्र मुथ्था
श्री. सागर जंबु चौगुले
श्री. गोविंद मुरलीधर अग्रवाल
श्री. लक्ष्मणराव मारूती पाटील
श्री. शिरीष शंकरराव पुरोहित

❖ तज्ज्ञ संचालक ❖

श्री. दिपक मनोहर पटवर्धन
श्री. विजय नरसिंह देशमुख

❖ मुख्य कार्यकारी अधिकारी ❖

सौ. सुरेखा विजय लवांडे



ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे

# अध्यक्षीय मनोगत

**सहकारी बंधूनो !**

देशातील एकूणच बँकिंग चळवळ सध्या संभ्रमावस्थेतून जात आहे. देशातील सर्व बँकांचा एन.पी.ए. ११ लाख कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे. हा एन.पी.ए. कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. बँकांमधील भष्टाचाराने तर उच्चांक गाठला आहे. दररोज नवनविन बँकांचे घोटाळे बाहेर येत आहेत. या बँकांना सरकारची मदत असल्यामुळे या बँका केवळ सुरू आहेत. परंतु सरकारने या बँकांवरील हात काढताच देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी होईल त्यामुळे सरकारला या बँका वाचविणे भागच आहे.

अशा संभ्रमावस्थेत देशातील सहकारी बँकांची व पतसंस्थांची चळवळ आहे. सहकारी बँकांबाबतीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्रातील ३४ जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये ८२६५ कोटी रुपयांचा एन.पी.ए. झालेला आहे. यामध्ये नाशिक, यवतमाळ, सोलापूर, बीड, बुलडाणा या बँका देशातील जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या एन.पी.ए.च्या आकडेवारी टॉप ५ मध्ये आहे. या बँकांमध्ये अडकलेल्या पतसंस्थांच्या गुंतवणूकीमुळे पतसंस्था देखील अडचणीत येत आहेत.

या सर्व बँकांना वाचविण्याचा देशपातळीवर व राज्य पातळीवर केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडून प्रयत्न चालू आहेत. परंतु राज्यातील पतसंस्थांच्या चळवळीला कोणत्याही प्रकारचा दिलासा केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडून दिला जाताना दिसत नाही. आतापर्यंत अनेक प्रयत्न करून देखील केंद्र सरकार व राज्य सरकार याबाबतीत उदासिनच आहे. असे नाईलाजाने म्हणावे लागते. नुकतेच महाराष्ट्र सरकारने सहकारी पतसंस्थांकरीता सहकार कायद्यात नविन स्वतंत्र प्रकरण समाविष्ठ केले. या नविन कायद्यान्वये सहकारी पतसंस्थांसाठी नियामक मंडळ अस्तित्वात येणार आहे. त्यामुळे पतसंस्थांना दिलासा मिळण्याऐवजी सहकारी पतसंस्था आणखीच अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सहकारी पतसंस्थांच्या वसुली कायद्यात गतिमानता आणण्यासाठी राज्यभर आंदोलने देखील केली गेली. परंतु ही गतिमानता आणणे तर दूरच राहीले याउलट राज्य सरकारने थकबाकी वसुलीवर घेण्यात येणारा सरचार्ज कमी करताना राज्यातील सर्वच फेडरेशनचे उत्पन्न कसे कमी होईल अशा प्रकारचे परिपत्रक काढलेले आहे. या परिपत्रकामुळे राज्यातील तालुका फेडरेशन, जिल्हा फेडरेशन, राज्य फेडरेशनला वसुलीचे काम करणे अतिशय अवघड होणार आहे. त्यामुळे वसुली अधिकाऱ्यांची संख्या कमी होऊन त्यांचा परिणाम पतसंस्थांचा एन.पी.ए. वाढण्यावर होऊ शकतो. वरील सर्व परिस्थितीचा विचार करता आपल्यालाच आपली चळवळ प्रामाणिकपणे प्रयत्न करून सुदृढ करावी लागणार आहे. या दृष्टीने दि. १६ जुलै २०१८ झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये 'सहकार जागृती यात्रा' काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या 'सहकार जागृती यात्रेचे' स्वरूप कसे असावे या विषयी राज्यातील पतसंस्था कार्यकर्त्यांनी आपली मनोगते महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या कार्यालयात पोस्टाने अथवा ई-मेल द्वारे पाठवावी ही विनंती.

■■■



विनोद कुलकर्णी

## संपादकीय



# प्रतिकूल परिस्थितीत पतसंस्थांपुढे स्थान टिकविण्याचे आव्हान

सध्या बाजारपेठेची असलेली स्थिती, केंद्र सरकारने गेल्या चार वर्षात घेतलेल्या विविध निर्णयामुळे झालेले चांगले-वाईट परिणाम, खासगी, पेमेंट, स्मॉल फायनान्स, ऑनलाईन फायनान्स यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सुविधा, त्यांच्याबरोबर पतसंस्थांना करावी लागणारी स्पर्धा, कायद्यातील तरतुदींमुळे स्पर्धा करताना येणारी मर्यादा लक्षात घेता पतसंस्था चळवळीसाठी प्रतिकूल परिस्थिती असून स्पर्धेत स्थान टिकविण्याचे आव्हान आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केल्यास पतसंस्थाही या स्पर्धेत आपले स्थान भक्कम करू शकतात.

सध्याच्या काळात चांगल्या कर्जदाराचा अभाव, थकीत कर्जखात्यांची नफ्यातून करावी लागणारी तरतूद, नफ्यावरील आयकर भरणा यासर्व बाबींचा परिणाम पतसंस्थांवर झालेला आहे. त्याचबरोबर इतर आव्हानेही आहेत ते पेलण्यासाठी पतसंस्था चळवळीच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने लवकरात लवकर कायद्यामध्ये काही बदल करावे लागतील. त्यासाठी एक अभ्यास गट तयार करावा लागेल. या गटाने समाजातील सर्व क्षेत्रातील व्यक्तींशी, समुहाशी चर्चा करून, संपर्क करून पतसंस्थांना स्पर्धेत टिकून राहण्यासाठी काय करणे गरजेचे आहे. कोणते बदल अपेक्षित आहेत. तातडीचे बदल कोणते? दीर्घकालीन उपाययोजना कोणत्या? त्यासाठीचा ॲक्शन प्लॅन असा अहवाल तयार करणे गरजेचे आहे. तो अहवाल शासनदरबारी देऊन त्याचा पाठपुरावा करण्यासाठी, चर्चा करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. केवळ ऑनलाईन कामकाज केल्याने, मोबाईल ॲप्लिकेशन, एटीएम सुविधा दिल्याने पतसंस्था स्पर्धेत टिकून राहील हे म्हणणे थोडे धाडसाचे होईल. यामुळे कामकाजात सुलभता येईल परंतु स्पर्धेत स्थान निर्माण करायचे असेल तर स्पर्धकांच्या तुल्यबळ सर्व सुविधाही द्यावा लागतील. ९७ व्या घटनादुरूस्तीप्रमाणे सहकारी कायद्यात आमुलाग्र बदल झाले आहेत. पण स्पर्धेत टिकण्यासाठी ते पुरेसे नाहीत. संचालकांच्या सहभागावर, सहकार्यावर व सकारात्मक वागणुकीवर कोणत्याही संस्थेचे यश अवलंबून असते. त्यासाठी संचालकांना व्यवस्थापनाच्या विविध क्षेत्राची माहिती देणे आवश्यक आहे. पुढील दहा वर्षानंतर पतसंस्थांचे स्थान काय असेल किंवा असावे? हा विचार करून त्यादृष्टीने पतसंस्था चळवळीसाठी काम करणाऱ्यांनी पाऊले टाकली पाहिजेत. संस्थेच्या संख्यात्मक व गुणात्मक विकासासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते ते करण्याची जबाबदारी त्या त्या संस्थेच्या संचालक मंडळाचीही आहे. जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करताना आपण विश्वस्त आहोत, ही भूमिका विसरून चालणार नाही. सद्यस्थितीत सहनशीलता, आर्थिक चारित्र्य जोपासणे, निर्णयशक्ती बळावणे या बाबी पाळणे, वाढवणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थिती असली तरी त्यावर सर्वांच्या सहकार्याने मात करणे शक्य असून त्यादृष्टीने प्रत्येकाने आपला हातभार देणे गरजेचे आहे.

■■■

# सहकारी संस्थांचे भवितव्य

नागरिकांनी एकत्र येऊन आर्थिक योगदान करून सहकारी तत्त्वांवर आर्थिक संस्था उभी करणे व या संस्थेमार्फत सभासदांच्या वैयक्तिक, व्यावसायिक अडचणी दूर करण्यासाठी अर्थ सहाय्य करणे किंवा पतपुरवठा करणे हा खरा सहकारी संस्थांचा उद्देश आहे. हेच खरे उद्दिष्ट आहे.

सहकारी संस्थांचे दोन प्रकार -

१) कृषि पतपुरवठा सहकारी संस्था

२) बिगरशेती पतपुरवठा सहकारी संस्था

बिगरशेती पतपुरवठा सहकारी संस्था बिगरशेती पतपुरवठा सहकारी संस्था ग्रामपातळीपासून शहरपातळीपर्यंत कार्यरत असतात. तथापि कृषि पतपुरवठा सहकारी संस्था विशेषत: ग्रामीण भागात व तालुका पातळीवर प्रभावीपणे कार्य करत असतात.

तसं पाहिलं तर सहकारी बँका व सहकारी संस्था या आर्थिक व्यवसाय करतात. जनतेकडून ठेवी स्वीकारणे व गरजू लोकांना या ठेवींमधून कर्जपुरवठा करणे म्हणजे आर्थिक व्यवसाय करणे होय. कोणत्याही आर्थिक व्यवसायात उत्पन्न मिळविण्याचा सर्वात मोठा व प्रभावी स्रोत म्हणजे कर्ज विभाग होय. कर्ज विभाग अत्यंत संवेदनशिल असल्यामुळे गैरव्यवहार आर्थिक घोटाळे यांना हा विभाग सहज बळी पडू शकतो. यामुळे संस्थेचे आर्थिक आरोग्य किरकोळ आजारापासून (अनियमित व थकबाकीत कर्ज खाती) ते गंभीर आजार (अनुत्पादित व बुडित खाती) मध्ये परावर्तीत होऊ शकते. सहकारी संस्था आर्थिक दृष्ट्या सकस, सक्षम व सशक्त रहावी यासाठी संस्थाचालकांनी काळजी घेतली पाहिजे. म्हणूनच कर्ज विभागाचे कार्य शिस्तीने नियमनियमावलीनुसार होणे आवश्यक आहे. पतसंस्थांमधील कर्ज खाती व्यवस्थित, नियमित व आरोग्यदायी रहाण्यासाठी कर्ज मागणी अर्ज स्वीकृतीपासून कर्जमंजुरीपर्यंत व कर्जमंजुरीपासून कर्जवाटपापर्यंत आणि त्यानंतरही कर्ज नियम नियमावलीचे काटेकोरपणे पालन करून कर्ज खात्यांवर योग्य नियंत्रण ठेवल्यास कर्जखाती अनियमित ते अनुत्पादित श्रेणीत जाणार नाहीत. यामध्ये थोडीसी जरी चूक झाली किंवा हलगर्जीपणा वा निष्काळजीपणा राहिला अथवा केला

> **एनपीएच्या चारही श्रेणीतील कारणे आपल्या सर्व कर्जखात्यांबाबतीत लागू पडतात का याची शहानिशा करावी. आर्थिक आरोग्याची सत्य स्थिती लक्षात येईल. सहकारी संस्थांचे विशेषत: पतसंस्थांचे आर्थिक आरोग्य चांगले राहण्यासाठी पुढील बाबींचा प्राधान्याने व सकारात्मक दृष्टीने विचार करावा लागेल. जेणेकरून व्यवस्थापकीय व प्रशासकीय व्यवस्थेमध्ये बदल घडविणे शक्य व सोपे होईल.**
>
> **सर्व प्रथम पतसंस्थांच्या व्यावसायिक व आर्थिक व्यवहारासाठी असलेले प्रस्थापित नियम, नियमावली, तत्त्वे, शिस्त, आदेश व मार्गदर्शक तत्त्वे यांचा आढावा घेऊन सद्यस्थितीला पोषक ठरतील अशा सुधारणा व दुरूस्ती करून बदल करणे आवश्यक आहे.**

तर कर्जखाते अनियमित अवस्थेतून हळूहळू अनुत्पादित खाते होणार हे निश्चित समजावे.

खर्जखाते अनियमित अवस्थेमध्ये, अनियमित अवस्थेमधून थकबाकीमध्ये थकबाकी अवस्थेमधून अनुत्पादित अवस्थेमध्ये आणि अनुत्पादित बुडित खात्यामध्ये कसे जाते याबद्दल सविस्तर माहिती घेऊया...

**एन.पी.ए. – १**

कर्जमागणी अर्ज स्वीकारल्यानंतर मागणी अर्जाची छाननी काळजीपूर्वक व मार्गदर्शक तत्त्वांनुसार केली जात नाही. त्यामुळे कर्जमागणी अर्ज स्वीकृतीयोग्य आहे किंवा नाही याची निश्चिती होत नाही. कर्जप्रकरणासाठी आवश्यक असलेले सर्व कागदपत्र व दस्तावेज कर्जमागणी अर्जासोबत जोडले जात नाहीत. अर्जदार ही सज्ञान, सक्षम व कायदेशीर व्यक्ती म्हणजेच लीगल एटिटी आहे काय याची खात्री केली जात नाही. अर्जदार एकच व्यक्ती (इंडिविज्युवल), समुह (ग्रुप) नोंदणीकृत भागीदारी संस्था (रजिस्टर्ड पार्टनरशिप फर्म) नोंदणीकृत कंपनी (रजिस्टर्ड कंपनी) किंवा नोंदणीकृत सहकारी संस्था (रजिस्टर्ड को-ऑपरेटिव्ह सोसायटी) आहे काय याचीही खातरजमा केली जात नाही. अर्जात दिलेल्या पत्त्यावरच अर्जदार रहातो का तसेच त्याचा व्यवसाय दिलेल्या पत्त्यावर चालू आहे का आणि गट किंवा सर्व्हे नंबरमधील शेतीची मालकी अर्जदाराकडेच आहे का याचीही खातरजमा केली जात नाही. या शेतीवर व इतर स्थावर मिळकतीवर कर्जबोजा किंवा कुणाचा हक्क आहे का या संबंधी वकिलाचे कायदेशीर मत घेतले जात नाही. मशिनरी वाहने, अवजारे व सर्व प्रकारचे पशुधन यांची मालकी अर्जदाराकडेच आहे याचीही खात्री केली जात नाही. अशाही स्थितीमध्ये कर्जमंजुरीसाठी पाठविल्यास व कर्ज मंजूर झाल्यास वरील बाबी कर्जखाते अनियमित होण्यास कारणीभूत होतात. कर्जखाते एनपीए होण्याची ही पहिली पायरी होय. म्हणजेच एनपीए १ अवस्था होय.

**एन.पी.ए.–२**

आदर्श व मान्यताप्राप्त नियमनियमावलींनुसार कर्ज प्रकरण मंजूर करण्यायोग्य आहे काय तसेच ज्या कारणासाठी कर्ज मागणी केली आहे ते कारण किंवा तो प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या योग्य व आर्थिकदृष्ट्या टिकाऊ स्वरूपाचा आहे काय याची मीमांसा किंवा सखोल तपासणी म्हणजेच ॲप्रेजल केले जात नाही. यामुळे कर्जखाते अनुत्पादित होऊ शकते. हा एनपीएचा दुसरा टप्पा.

**एन.पी.ए.–३**

विभागीय किंवा मुख्य कार्यालयाकडून कर्ज प्रकरणासंबंधी मंजूरीपूर्व निर्देशित केलेल्या निरिक्षणांची पूर्तता केली जात नाही किंवा केलेल्या लेखी चौकशीला समाधानकारक उत्तर दिले जात नाही. तसेच निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दूर केल्या जात नाहीत. नाबार्ड सहकार खाते व शिखर बँक यांचे आदेश व मार्गदर्शनपर सूचना यांची काटेकोर अंमलबजावणी केली जात नाही. कर्जवाटप करण्यापूर्वी कर्जमंजूरी पत्रातील शर्ती व अटी यांची परिपूर्ण पूर्तता केली जात नाही. विशेषत: कर्ज दस्तावेजसाठी योग्य मूल्यांचे स्टॅम्प पेपर किंवा बाँड वापरले जात नाहीत. सर्व कर्ज दस्तावेजांवर कर्जदार व जामीनदार यांच्या सह्या घेतल्या जात नाहीत. तारणाच्या प्रकारानुसार योग्य मूल्यांचा स्टॅम्प पेपर वापरून नजर गहाण खत किंवा स्थावर गहाण खत यांची निबंधकाकडे नोंदणी केली जात नाही. तसेच सिटी सर्व्हे किंवा आणि ७, १२ उतारा यावर कर्ज बोजा नोंदविला जात नाही. म्हणजेच या सर्व बाबतीत अनास्था दाखविणे, निष्काळजीपणाने कामात टाळाटाळ करणे या सर्व अवस्था म्हणजे एनपीए–३ होय.

**एन.पी.ए.–४**

कर्जवाटप केल्यानंतर शर्तीनुसार निश्चित केलेल्या ठराविक कालावधीनंतर तारणांची तपासणी केली जात नाही. दिलेल्या पत्त्यावर व्यवसाय चालू असल्याबद्दलची खात्री केली जात नाही. शर्ती व अटींनुसार कर्ज रकमेची हप्त्याने किंवा एकरकमी वसुली याबाबत प्रामाणिक प्रयत्न केले जात नाहीत किंवा त्यासाठी गांभीर्याने पाठपुरावा केला जात नाही. संस्थेचे जिल्हा बँकेचे शिखर बँकेचे तपासनीस तसेच शासकीय सहकार खात्याचे

लेखा परीक्षक यांनी नोंदविलेल्या निरिक्षणांची पूर्तता केली जात नाही किंवा तपासनीस व लेखा परीक्षक यांना कर्जखात्याचे आरोग्य बिघडल्याचे गांभीर्य लक्षात येत नाही किंवा बिघडलेल्या स्थितीकडे ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. कर्जखाते थकबाकीत गेल्यावर किंवा अनुत्पादित झाल्यावर कर्जवसुलीसाठी संस्थेकडून मागणी नोटीस पाठविली जात नाही. संस्थेस तारण दिलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता सनदशिर मार्गाने ताब्यात घेतल्या जात नाहीत. नोटीस मुदत संपल्यानंतर कलम १०१ खाली कर्ज वसुलीसाठी प्रस्ताव दाखल केले जात नाहीत. या अवस्था म्हणजे एनपीए-४ होय.

वरील विवेचनाचा गांभीर्याने विचार केला असता असे दिसून येते की, सर्वसाधारणपणे रक्कम रुपये दहा लाखापर्यंतच्या अनुत्पादित खात्यामधील वसुलीसाठी जेवढे प्रामाणिक प्रयत्न केले जातात तेवढे प्रयत्न दहा लाखावरील अनुत्पादित खात्यामधील वसुलीसाठी प्रयत्न केले जात नाहीत. मागील काही वर्षांपासून बऱ्याच सहकारी संस्थांमध्ये विशेषत: पतसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिकघोटाळे होऊन या संस्था बंद पडल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. अर्थात यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. कारण असे आर्थिकघोटाळे होऊ देण्यात संस्थांचे संचालक मंडळ, पदाधिकारी व प्रशासन प्रमुख जबाबदार असल्याचे शासकीय तपासणीत आढळून आले आहे. शिवाय अशा घोटाळ्यास हीच मंडळी जबाबदार आहेत हे सर्वसामान्य जनता, खातेदार व सभासद यांचेही मत आहे. एनपीए-१ ते एनपीए-४ यात विषद केलेली कारणेच आर्थिक घोटाळे करण्यास कारणीभूत झाली आहेत हे सहज लक्षात येईल.

याचा स्पष्ट अर्थ असा होतो की ज्या संस्था बंद पडल्या त्यांचे संचालक, पदाधिकारी, प्रशासन प्रमुख व कर्जविभाग प्रमुख, तपासनीस लेखा परिक्षक, शाखा व्यवस्थापकयांना वर उल्लेखिलेल्या चारही एनपीए अवस्था होण्याच्या कारणांची पूर्ण माहिती व ज्ञान असते. नुसती माहिती होती असे नव्हे तर व्यवस्थापन व प्रशासन किंवा सभासद यामधील प्रभावशाली व्यक्तींचाच इशाऱ्यावरून व दबावाखाली आर्थिक घोटाळे झालेले आहेत हे सहकार खाते व पोलीस यांनी केलेल्या तपासातून दिसून आले आहे.

सहकारी संस्थांची संख्या विचारात घेतली असता आर्थिक घोटाळ्यामुळे बंद पडलेल्या संस्थांची संख्या टक्केवारीत कमी दिसत असली तरी ज्या संस्था कार्यरत आहेत त्यांनी आर्थिक आरोग्याची मनापासून तपासणी करावी. एनपीएच्या चारही श्रेणीतील कारणे आपल्या सर्व कर्जखात्यांबाबतीत लागू पडतात का याची शहानिशा करावी. आर्थिक आरोग्याची सत्य स्थिती लक्षात येईल. सहकारी संस्थांचे विशेषत: पतसंस्थांचे आर्थिक आरोग्य चांगले राहण्यासाठी पुढील बाबींचा प्राधान्याने व सकारात्मक दृष्टीने विचार करावा लागेल. जेणेकरून



श्रमं एव जयते ।

# कर्मवीर मल्टिस्टेट

## कर्मवीर भाऊराव पाटील मल्टिस्टेट को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. जयसिंगपूर

राधाबाई रोड, ९ वी गल्ली, जयसिंगपूर ४१६१०१ जि. कोल्हापूर
फोन : (०२३२२) २२८३५३, २२८३५४ Email: karmaveerjsp@hotmail.com

### महाराष्ट्र व कर्नाटकातील एक अग्रगण्य मल्टिस्टेट संस्था

### सांपत्तिक स्थिती ३१.३.२०१८

| | |
|---|---|
| सभासद संख्या | : १२५१४ |
| वसुल भाग भांडवल | : ६ कोटी २४ लाख |
| निधी | : ३१ कोटी ८६ लाख |
| ठेवी | : ३७२ कोटी |
| येणे कर्ज | : २३० कोटी |
| गुंतवणूक | : १८१ कोटी |
| खेळते भांडवल | : ४२७ कोटी |

### आकर्षक व्याज दर

| | |
|---|---|
| सेव्हिंग | ४% |
| सुपर सेव्हिंग | ६% |
| किमान ४६ दिवस | ७.५% |
| १८१ दिवस मुदत ठेव | ८% |
| १ वर्षे पुर्ण ते ५ वर्षापर्यत मुदत ठेव (मासिक/ तिमाही व्याज घेण्याची सोय) | ८.५% |
| स्पेशल मुदत ठेव ३६५ दिवस | ९% |
| ३ वर्ष पूर्ण ते ५ वर्षापर्यंत मुदत व पुर्नगुंतवणुक | ८.५% |
| ५ वर्ष पूर्ण ते ७ वर्षापर्यंत | ८.७५% |
| कर्मवीर ठेव (दामदुप्पट) | ८ वर्षे |

१ वर्षे पूर्ण ते पुढे ज्येष्ठ नागरिकांना ०.५% वाढीव दर

CORE BANKING
SMS BANKING
MOBILE BANKING
RTGS / NEFT
AEPS

आम्ही राहतो 'अपडेट' कारण...
**आम्ही जाणतो तुमच्या गरजा...**



**सौजन्यपूर्ण सेवेसाठी २७ शाखांची शृंखला...**

श्रीधर चंदोबा — मॅनेजर
सागर चौगुले — व्हा. चेअरमन
भाऊसो सुर्यवंशी — चेअरमन

* संचालक मंडळ *

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रा. डी. ए. पाटील | बाबासो हुपरे | अरविंद मजलेकर | भुपाल गिरमल | विजय आवटी | रावसो पाटील |
| भरत गाट | आदिनाथ किणींगे | अनिल भोकरे | रमेश पाटील | कुमार पाटील | सुकुमार पाटील |
| भाऊसो पाटील | सौ.ज्योत्स्ना नांदणे | सौ.सुरेखा मलिकवाडे | राजाराम शिंदे | पांडुरंग काळे | शिवाजी कोळी |

व्यवस्थापकीय व प्रशासकीय व्यवस्थेमध्ये बदल घडविणे शक्य व सोपे होईल.

सर्व प्रथम पतसंस्थांच्या व्यावसायिक व आर्थिक व्यवहारासाठी असलेले प्रस्थापित नियम, नियमावली, तत्त्वे, शिस्त, आदेश व मार्गदर्शक तत्त्वे यांचा आढावा घेऊन सद्यस्थितीला पोषक ठरतील अशा सुधारणा व दुरूस्ती करून बदल करणे आवश्यक आहे.

**असे सुधारित नियम अधिक कडक असावेत.**

- अशा सुधारित नियम नियमावलींचे पालन न करणाऱ्या किंवा त्यांचे भंग करणाऱ्या कोणत्याही श्रेणीतील कर्मचाऱ्यास तसेच संचालक मंडळातील पदाधिकारी किंवा संचालक यांना जबरदस्त शिक्षा करण्याचे प्रावधान असावे.
- संस्थेच्या शाखेतील विभागीय कार्यालयातील तसेच मुख्य कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी यांची दर तीन वर्षांनी बदली करावी.
- किमान सलग दहा वर्षे भागधारक सभासद असलेल्या व सर्व वार्षिक सभेस उपस्थित असलेल्या व्यक्तीलाच संचालक मंडळाचे सदस्य होता येईल अशी नियमात दुरूस्ती करावी.
- सलग किंवा खंडित अशा एकूण पंधरा वर्षे कालावधीसाठीच संचालक किंवा पदाधिकारी पदावर सभासद रहाता येईल अशी नियमात दुरूस्ती करावी.
- राज्यातील सर्व पतसंस्थांमधील व्यवस्थापक पदामधील नेमणूक महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांचे मार्फत करावी.
- या पदावर नेमणूक केलेल्या व्यक्तीची सेवा बदलीपात्र व कायमस्वरूपी असावी. तसेच व्यवस्थापकाची दर तीन वर्षांनी दुसऱ्या सक्षम पतसंस्थेत समकक्ष पदावर बदली करावी.
- प्रत्येक पतसंस्थेची तपासणी जिल्हा बँकेकडून दर तीन महिन्यांनी शिखर बँकेकडून दर सहा महिन्यांनी केली जावी. वार्षिक लेखा परिक्षर शासकीय लेखा परिक्षकाकडून केले जावे. या लेखा परिक्षण अहवालात त्रैमासिक व अर्धवार्षिक तपासणीतील निरिक्षणांची समाधानकारक दोषदुरूस्ती पतसंस्थेने केली किंवा नाही याचा खास उल्लेख असावा.
- सहकारी संस्था कायदा व नियम यामध्ये तरतूद असली तरच उपाध्यक्ष, जनसंपर्क संचालक व इतर पदाधिकारी यांची नियुक्ती करावी.

अर्थात व्यवस्थेमध्ये करण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या या लोकांमध्ये विशेषत: संस्था चालकांमध्ये जबरदस्त इच्छाशक्ती हवी. तथापि पतसंस्थांमध्ये घडलेल्या आजपर्यंतच्या विविध घटना व प्रसंग यावरून असे जाणवते की जबरदस्त सोडाच साधी इच्छासुद्धा या संस्था चालकांमध्ये होणार नाही व याच पतसंस्थांमध्ये आर्थिक व्यवहार संशयास्पद व बनावट आढळून आले तरीदेखील याबाबतीतची जबाबदारी निश्चित करण्यात नाही. कायदेशीर कारवाई देखील करण्यात येत नाही. शासनामध्ये देखील ईच्छाशक्तीचा अभाव प्रकर्षाने जाणवतो असेच सर्वसामान्य जनतेस म्हणावयाची वेळ आली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही.

व्यवस्थापन व मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतलेल्या प्रभावशाली व्यक्ती यांचे आपसात अर्थपूर्ण जवळचे संबंध असल्यामुळे पतसंस्थांच्या प्रशासनास नियमाप्रमाणे कायद्याच्या चौकटीमध्ये राहून कामकाज करणे अवघड जाते. हा महत्त्वाचा घटक पतसंस्थांच्या आस्तित्वास व व्यावसायिक प्रगतीस मारक ठरत आहे.

पतसंस्थांचे भवितव्य खरोखरीच उज्ज्वल व्हावयाचे असेल व समाज आणि जनता यांचेमध्ये आदराचे व आपलेपणाचे स्थान निर्माण करायचे असेल तर वरील सूचनांचा गांभीर्याने व सकारात्मक दृष्टीने विचार करून व्यवसाय व व्यवहार यासाठी अंमलबजावणी केली तर पतसंस्थांचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल होईल याबद्दल तीळमात्र शंका नाही.

**– विजय देशपांडे**

(सहकारी संस्था सल्लागार व प्रशिक्षक)

# प्रशिक्षण

आपल्या देशामध्ये सहकाराला सुरूवात होऊन जवळपास ११४ वर्ष झाले. १९०४ ला पहिली सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. तो काळ पारतंत्र्याचा होता. पहिली सहकारी संस्था देखील महाराष्ट्रीयन व्यक्तीनेच स्थापन केली. ती देखील गुजराथमध्ये 'अन्योन सहकारी (बडोदा) मंडळी' या नावाने संस्थेला सुरूवात झाली. त्याचे संस्थापक कै. कानठेकरजी होते. लोकांच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेची स्थापना केली जात होती. सुरूवातीच्या काळात ग्रामीण भागात शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे साहित्य, अवजारे या संबंधी संस्था स्थापन झाल्या. सहकाराचे मुख्य उद्दिष्ट्य म्हणजे शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला 'सावकाराच्या पाशातून मुक्त करणे हे होते.

महाराष्ट्रामध्ये १९६० ला सहकारी कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर कालांतराने परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल होत गेले. देशपातळीवर पहिल्यांदाच सहकार हा विषय केंद्र सरकारच्या यादीमध्ये आला व त्याकरीता ९७ वी घटना दुरूस्ती देखील करण्यात आली. 'सहकारी संस्था' स्थापना करण्याचा अधिकार घटनेत करण्यात आला.

महाराष्ट्रामध्ये सहकार स्थापन झाला, रूजला १०० वर्षात अनेक सहकारी संस्था अस्तित्वात आल्या कालांतराने त्यामध्ये दोष देखील निर्माण झाले. सहकार क्षेत्रात महान व्यक्ती होऊन गेल्या पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, सहकार भारतीचे संस्थापक लक्ष्मणराव इनामदार, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील अशी अनेक सहकार महर्षी महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांनी महाराष्ट्र 'सुजलाम् सुफलाम्' केला. अनेक संस्थांच्या माध्यमातून विकासाची गंगा महाराष्ट्रात आणली. विविध संस्था जसे कार्यकारी, दुग्ध, मच्छीमार, गृहनिर्माण, पतसंस्था, नागरी सहकारी बँक, जिल्हा बँक, राज्य सहकारी बँक, सुतगिरण्या, साखर कारखाने इत्यादी अनेक सहकारी संस्था आल्या आणि महाराष्ट्र समृद्ध केला.

९७ व्या घटना दुरूस्तीमध्ये या सर्व सहकारी संस्था व्यवस्थित चालल्या पाहिजे, प्रगती झाली पाहिजे म्हणून 'प्रशिक्षण' हा विषय त्यात अंर्तभूत करून सर्व सहकारी संस्थांच्या सभासदांना, संचालकांना व सेवकांना प्रशिक्षण घेणे बंधनकारक केले. तेव्हा पासूनच प्रशिक्षणाचा विषय चर्चेत आल्यामुळे 'महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई देखील त्याकडे गांभीर्याने पाहून राज्यातील १६००० पतसंस्थांना प्रशिक्षित करण्याकरीता प्रशिक्षणाची योजना तयार केली आहे. त्यानुसार 'शिखर संस्था' दर्जा असलेली व विद्यमान सहकार परिषदेचे अध्यक्ष नामदार श्री. शेखरजी चरेगांवकर (राज्यमंत्री दर्जा) यांनी स्थापन केलेली व 'सहकार भारती सहकार प्रशिक्षण संस्था' या संस्थेशी करार करून भविष्यात सर्व पतसंस्थांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष मा. श्री ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे व सर्व पदाधिकाऱ्यांनी व संचालकमंडळीनी निश्चित केला आहे. त्यानुसार पतसंस्थांच्या विषयानुसार व कर्मचाऱ्यांच्या श्रेणीनुसार नियोजन करण्यात आले असून शिर्डी, अहमदनगर येथील राज्य फेडरेशनचे 'सहकार प्रशिक्षण व संशोधन मंदिरात' घेण्याचे ठरविले आहे. प्रत्येक महिन्याच्या दुसरा व चवथ्या शनिवार - रविवार हे वर्ग होतील.

तसेच प्रशिक्षण हे सर्वांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात संस्थांची तयारी असल्यास तालुक्यात देखील प्रशिक्षण घेण्याची तयारी राज्य फेडरेशनने केली आहे. यामध्ये तज्ज्ञ प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. तसेच विविध विषयांच्या नोटस् देखील देण्याचा मानस आहे. राज्यातील सर्व पतसंस्थांनी या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात सहभागी होऊन सहकार्य करावे हि विनंती.

**सुदर्शन भालेराव**
**प्रशिक्षण प्रमुख**
**महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या.,**

# निर्णय प्रक्रिया कशी असावी ?

जेव्हा जेव्हा व्यवस्थापक व्यवस्थापनाचे काम करतो, त्यावेळी तो ते काम निर्णय घेऊन करतो. तसेच दैनंदिन जीवनात देखील वारंवार प्रत्येकाला निर्णय घ्यावे लागतात. व्यवस्थापकाचे आयुष्य म्हणजे निर्णय घेण्याची हमीची प्रक्रिया आहे. व्यवस्थापकाचे अधिकार मुख्यत: निर्णय घेण्यासाठी आणि घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी योग्य दिशेने होते आहे की नाही हे सतत पाहण्यासाठीच असतात असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. सध्याच्या स्पर्धेच्या युगात व्यवस्थापकांची भूमिका जास्तच जबाबदारीची आहे. नवीन आव्हाने पेलणे, सभोवतालच्या परिस्थितीचे अवलोकन करून त्याप्रमाणे वारंवार निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी होत असताना प्रभावशाली संदेशवहन यंत्रणा प्रस्थापित करून संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे. निर्णय घेण्याचे कार्य व्यवस्थापनाच्या सर्व कृतींशी निगडीत असते. व्यवसाय संस्थेतील प्रत्येक विभागात हे चालते. प्रत्येक विषयाशी त्याचा संबंध असतो.

निर्णयाविना व्यवस्थापन म्हणजे पाठीच्या कण्याशिवाय असलेला माणूस होय. उत्कृष्ट निर्णय घेणे, हे नियोजनाच्या कार्यात जितके महत्त्वाचे आहे तितकेच संघटन, संचालन, नियंत्रण या इतर व्यवस्थापकीय कार्यांमध्येही महत्त्वाचे आहे. प्रत्येक क्षेत्रात निर्णय घेण्याला फार महत्त्व आहे. तसेच सध्याच्या स्पर्धेच्या युगात उत्कृष्ट निर्णय घेणे फार महत्त्वाचे आहे. तसेच व्यवसायाची वाढ होण्याच्या दृष्टिकोनातून त्यात सर्वांच्याच हिताचा विचार करून निर्णय घेणे फार महत्त्वाचे बनले आहे.

> निर्णय घेत असताना वेळेला महत्त्व देणे गरजेचे आहे. यात माहिती मागविण्याकरिता पर्यायांची निवड करणे, यामुळे थोडासा लागण्याची शक्यता असते. तेच कार्य द्रुतगतीने होणे आवश्यक असते. म्हणजेच वेळेत निर्णय घेणे सोईचे आहे. निर्णय घेताना मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याचे विश्लेषण व सद्सद्विवेकबुद्धी यांचे किती महत्व असते आणि अंत:स्फूर्ती व निर्णयशक्ती यांना किंपत वाव असतो, हे सांगणे कठीण आहे. या सर्व बाबी व्यक्ती व्यक्तीवर अवलंबून असतात. त्यांच्या निर्णयाच्या प्रकाराप्रमाणे व प्राप्त परिस्थितीचा विचार केला असता वारंवार त्या बदलतात. म्हणूनच निर्णय घेणे हे शास्त्र नसून ती एक कला आहे. असे अनेकदा मानण्यात येते. त्यासाी वारंवार निर्णय घेणाऱ्या व्यक्तीने संबंधित ज्ञानात भर टाकणे व वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव अभ्यासात घेऊन निर्णय घेणे योग्य होईल.

**निर्णय घेण्याची वैशिष्ट्ये :**

१) निर्णय घेणे म्हणजे अनेक पर्यायांमधून उत्कृष्ट पर्यायाची निवड केलेला पर्याय निवडणे, म्हणजेच निष्कर्षाप्रत येणे, निर्णय घेणे म्हणजे उपलब्ध असलेल्या पर्यायी कृतींमधून जास्तीत जास्त उत्कृष्ट, विधायक, सकारात्मक चांगल्या कृतींची निवड करण्याची प्रक्रिया,




निर्णय ही निवड असल्याने ती सकारात्मक असू शकते. काहीही निर्णय न घेणे किंवा कृती न करणे हा देखील निर्णय होऊ शकतो.

२) निर्णय घेणे ही त्याबाबतच्या प्रक्रियेचा शेवट असतो. निर्णय घेण्याअगोदर विचारविनिमय व चिंतन झालेले असते. त्यांची महत्त्वाची कारणे बहुतेक व्यवसायाच्या बाबत वेगवेगळ्या समस्या असू शकतात. या सर्व बाबींच्या सारासार विचारांचा तुलनात्मक अभ्यास सर्वांगांनी करूनच अंतिम पर्यायाची निवड करणे योग्य आहे.

३) निर्णय घेणे ही वैचारिक किंवा बुद्धिनिष्ठ प्रक्रिया आहे. कारण निर्णय घेण्याअगोदर निर्णय घेणाऱ्या व्यक्तीला अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. वेगवेगळ्या कल्पना, क्लृप्त्या लढवून अनेक गुंतागुंतीच्या घटकांचे परस्परसंबंध लक्षात ठेवून कृती या दोन प्रकारच्या असू शकतात. पहिला प्रकार अटकळ, बुद्धी, विचार विनिमय यांचा वापर करून केलेली कृती व दुसरा प्रकार अजाणतेपणी केलेली कृती किंवा ओघाने घडणाऱ्या कृती यांचा समावेश होऊ शकतो. मात्र, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत पहिल्या कृतीचा संबंध येतो. अशा वेळी भावना, नातेसंबंध, मैत्रीसंबंध आदी घटक यांचा प्रभाव असतो. ते लक्षात घेऊन प्रसंगी नियंत्रण ठेवून निर्णय घेणे आवश्यक आहे.

४) निर्णय घेण्याचे काम नेहमी एखाद्या प्रश्नांशी, अडचणीशी अथवा संघर्षातून सोडवणूक करणे यांच्याशी संबंधित असते. अशा वेळी बरीचशी माहिती एकत्रित भागवूनच त्यावर निर्णय घ्यावा लागतो. त्यात मुख्यत्वे १. प्राथमिक माहिती २. द्वितीय माहिती ३. तृतीय स्तरावरची माहिती उपलब्ध करून त्याआधारे निर्णय घेणे आवश्यक आहे.

५) प्रत्येक निर्णयामध्ये कृतीशी बांधिलकी ही संकल्पना अभिप्रेत आहे. कृतीशी निर्णयाचा संबंध असल्यामुळे व्यवसाय संस्थेला स्थैर्य प्राप्त होत असते. संघटनेत कार्यरत असणाऱ्या लोकांच्या अपेक्षेप्रमाणे निर्णय असे भाग बनतात.

६) निर्णयात लवचिकता असावी. घेतलेले निर्णय म्हणजे त्याप्रमाणेच अंमलबजावणी झाली पाहिजे. असे नाही. मात्र, निर्णय बदलावयाचा असल्यास त्याच्या परिणामाबाबतची माहिती प्रभावी संदेशवहन यंत्रणेमार्फत वारंवार मागणी करून त्यानुसार प्रासंगिक, तात्पुरते बदल करण्यात यावेत. यामुळे त्यातील फलित मिळू शकते.

७) निर्णय घेत असताना वेळेला महत्त्व देणे गरजेचे आहे. यात माहिती मागविण्याकरिता पर्यायांची निवड करणे, यामुळे थोडासा लागण्याची शक्यता असते. तेच कार्य द्रुतगतीने होणे आवश्यक असते.

म्हणजेच वेळेत निर्णय घेणे सोईचे आहे. निर्णय घेताना मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याचे विश्लेषण व सद्सद्विवेकबुद्धी यांचे किती महत्त्व असते आणि अंत:स्फूर्ती व निर्णयशक्ती यांना कितपत वाव असतो, हे सांगणे कठीण आहे. या सर्व बाबी व्यक्ती व्यक्तीवर अवलंबून असतात. त्यांच्या निर्णयाच्या प्रकाराप्रमाणे व प्राप्त परिस्थितीचा विचार केला असता वारंवार त्या बदलतात. म्हणूनच निर्णय घेणे हे शास्त्र नसून ती एक कला आहे. असे अनेकदा मानण्यात येते. त्यासाठी वारंवार निर्णय घेणाऱ्या व्यक्तीने संबंधित ज्ञानात भर टाकणे व वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव अभ्यासात घेऊन निर्णय घेणे योग्य होईल.

निर्णय घेतल्यावर त्याची योग्य कार्यवाही होण्याच्या दृष्टीने तो निर्णय संबंधितांना कळवावा लागतो. त्यासाठी घेतलेल्या निर्णयाचे त्यांनी कृतीविषयक कार्यक्रमात रूपांतर केले पाहिजे व तो त्यांच्या कनिष्ठांना स्पष्टपणे व अचूकपणे समक्ष सांगितला पाहिजे. कारण त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी व्यवस्थापकाला त्याच्या सहकाऱ्यांकडून करवून घ्यावयाची असते. त्यामुळे त्यात त्यांचा सहभाग पूर्णपणे मिळविण्याच्या दृष्टीने सर्वांशी चर्चा करून कामकाजाची विभागणी करून प्रत्येकावर जबाबदारी टाकावी. त्या वेळी त्यांच्या आवडीचाही विचार करावा. तरच उत्कृष्ट अंमलबजावणी होऊ शकते. तसेच त्यांना वारंवार संस्थेचा उद्देश, आपल्या गटाचे उत्कृष्ट कामकाज याबाबत जाणीव करून देणे महत्त्वाचे असते. म्हणजे स्वयंस्फूर्तीने प्रत्येक जण कामकाजात सहभागी होतो. तसेच त्यांना अभिप्रेरणा द्यावी लागते म्हणजे अंमलबजावणी व्यवस्थित होते. निर्णय घेण्यापासून ते कृती करते वेळी कनिष्ठांचा जास्तीत जास्त सहभाग असावा म्हणजे त्यांनाही कामकाजाबाबत जास्तीत जास्त उत्साह वाटतो.

**निर्णयाचा पाठपुरावा**

निर्णयाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी निर्णयाची फलिते पडताळून पाहिली पाहिजेत. त्यात काही अडचणी आहेत का? त्यांना इतर काही मदतीची आवश्यकता आहे का? आदी बाबींचा विचार करून अडचणीच्या वेळी त्यांना लागणारी मदत त्वरित पूर्ण करून दिल्यास इच्छित फलित इच्छित वेळेत पूर्ण होऊ शकते. अन्यथा, जास्त वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही निर्णय वेळेवर न घेतल्यामुळे त्याचा विपरित परिणामही होऊ शकतो. यासाठी सतत सतर्क राहून अनौपचारिकरीत्या संबंध प्रस्थापित केले, तर सर्वांचाच चांगला सहभाग मिळू शकतो.

स्टॅन्ले हॉन्स यांनी निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत पुढीलप्रमाणे टप्पे असल्याचे निदर्शनास आणले आहे.

१) प्रश्नाची समज
२) पर्यायी उत्तरांची निर्मिती
३) पर्यायांची छाननी
४) पर्यायांचा तुलनात्मक विचार
५) उत्कृष्ट पर्यायाची निवड
६) निर्णयाचे प्रसिद्धीकरण
७) निर्णयाची कृतीत अंमलबजावणी

